इतर किरकोळ अर्ज क्र.३१/२०२६
जी.आर.पी.कल्याण गु.र.क्र.आय १५५/२०२६

**इतर किरकोळ अर्ज क्रं. ३१/२०२६ मधील नि. १ वरील आदेश**
**(श्रीमती जिजाबाई वामन शिंगोटे वि. जी.आर.पी कल्याण)**

१. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार **श्रीमती जिजाबाई वामन शिंगोटे** हयांनी सदरच्या गुन्हयामध्ये त्यांची एक तुटलेली सोन्याची बांगडीचा १० ग्रॅम वजनाचा तुकडा व ४.९९५ ग्रॅम वजनाचा तुटलेल्या बांगडीचा ताबा मिळण्याबाबत केलेला आहे. सदर अर्जासोबत अर्जदारांनी अर्जातील मजकुराच्या सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. अर्जदाराने दिलेल्या अर्जावर सरकारी वकील, आरोपी व तपासी अधिकारी यांचे म्हणणे मागवले. सरकारी वकीलांनी असे कथन केले आहे की, उपरोक्त अर्जदार मुळ फिर्यादी यांच्या अर्जात नमुद मुददेमाल हा महत्वाचा पुरावा असून तपासी अंमलदार यांचे म्हणणे पाहता संपरिक्षणास बाधा येणार नाही अशा अटी व शर्तीवर हस्तंतरीत करण्यास हरकत नाही. आरोपीनी त्यांचे म्हणणे पाहता कोणतीही हरकत घेतली नाही.

३. अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जासोबत कल्याण लोहमार्ग पोलिस स्टेशन गु.र.नं. १५५/२०२६ भान्यासं कलम ३०३ (२) अन्वये दाखल गुन्हाची प्रथम खबर अहवाल, अर्जदाराच्या पतीचा मृत्यु दाखला, सोन्याचे दागिने खरेदीच्या पावत्या व अर्जदाराचे आधार कार्डची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

४. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन करता प्रस्तूत गुन्हयाची तक्रार ही अर्जदार यांनी दिल्याचे दिसुन येत असुन सदरच्या तक्रारीमध्ये त्यांनी चोरीच्या घटनेमध्ये एक तुटलेली सोन्याची बांगडीचा १० ग्रॅम वजनाचा तुकडा व ४. ९९५ ग्रॅम वजनाची तुटलेल्या बांगडी चोरीस गेल्याचे कथन केल्याचे दिसुन येत आहे. तपासी अंमलदार यांचे प्रस्तुत अर्जास दिलेले म्हणणे पहाता, प्रस्तुत गुन्हाच्या तपासादरम्यान त्यांनी प्रस्तुत गुन्हाकामी एक तुटलेली सोन्याची बांगडीचा १० ग्रॅम वजनाचा तुकडा व ४.९९५ ग्रॅम वजनाचा तुटलेल्या बांगडीचा तुकडा जप्त केल्याचे दिसुन येत आहे. कागदापत्रांचे अवलोकन करता प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेली बांगडी ही अर्जदाराच्या पतीच्या नावे असल्याचे दिसून येत आहे. परंतु अर्जदाराचे पती

वामन शिंगोटे हयांचे दिनांक ०६/१०/२०१८ रोजी निधन झाल्यामुळे सदर बांगडीवर अर्जदार हयाची मालक हक्क आहे. आज रोजी पर्यंत अर्जदाराच्या व्यतिरिक्त सदर मुददेमाल परत मिळविण्यासाठी कुणीही अर्ज दाखल केलेला नाही त्यामुळे अर्जदाराने मागणी केलेला मुददेमाल सदर खटल्याचा निकाल लागेपर्यत, काही अटी व शर्तीवर तिला परत देणे न्यायोचित ठरेल. सबब खालील आदेश.

**: आदेश :**

| | |
|---|---|
| १) | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २) | जप्त मुद्देमाल एक तुटलेली सोन्याची बांगडीचा १० ग्रॅम वजनाचा तुकडा व ४.९९५ ग्रॅम वजनाचा तुटलेल्या बांगडीचा ताबा अर्जदार **जिजाबाई वामन शिंगोटे** हयांना रु.२५,०००/—(रु. पंचवीस हजार मात्र) च्या बंधपत्रावर देण्यात यावा. |
| ३) | खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यत तक्रारदार हिने सदर मुददेमाल विकणे, गहाण ठेवणे, अदला—बदल करणे अथवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये. |
| ४) | संबंधीत चौकशी अधिका—यांनी तक्रारदार हिच्या खर्चाने जप्त मुद्देमालाचे प्रत्येक बाजुचे छायाचित्र काढून पंचनामा करावा, छायाचित्रे व पंचनामा प्रकरणात दाखल करावे. |
| ५) | आवश्यक असल्यास तक्रारदार हिने मुददेमालासहीत न्यायालयात हजर रहावे. |
| ६) | चौकशी अधिका—यांनी वरील मुद्देमाल तक्रारदार हिला परत द्यावा. |

VISHWAS PANDURANG SHINDE

Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.06.25 17:20:59 +0530

(व्ही.पी.शिंदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लोहमार्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण.

कल्याण
दिनांक : २४/०६/२०२६